## विषयसूची


卐 ग्रंथाच्या संकलकांचा परिचय ५

卐 ग्रंथाचे मनोगत ७


## ग्रंथाची अनुक्रमणिका


१. ईश्वराच्या निर्गुण रूपाचा वाचक ‘ॐ’ याचा जप प्राथमिक अवस्थेतील साधकाकडून भक्तीभावाने होण्यातील कठीणता ९

२. वाईट शक्तींच्या त्रासांचे निवारण आणि आध्यात्मिक उन्नती यांसाठी कोणते नामजपादी उपाय करावेत ? १०

३. उद्देशानुसार नामजप करणे ४६

४. कोणते नामजप करू नयेत ? ५५

५. काही संत, मुनी आणि भक्त करत असलेले नामजप ५८

६. सांप्रदायिक नामजप ५९

७. प्रांत आणि भाषा यांनुसार नामजप ६३

८. काही पंथांतील नामजप ६३

९. नामाच्या अर्थानुसार होणारे परिणाम ६५

१०. निरनिराळ्या नामांचे निरनिराळ्या देहांच्या स्पंदनसंख्येशी जुळणे आणि त्यांची परमेश्वराशी एकरूप करण्याची क्षमता ६५

११. काही देवतांच्या नामांचे परिणाम ६६

१२. नामजपाने काही वेळा त्रास होणे ६९

१३. नामजपामुळे होऊ शकणारी हानी आणि त्यावरील उपाय ७१

卐 **संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि अन्य माहिती** ७२

## ग्रंथाचे मनोगत

'कलियुगात ईश्वरप्राप्ती करून घेण्यासाठी नामजप हे सर्वोत्तम साधन आहे', असे अनेक संतांनी सांगितले आहे. कालमाहात्म्यानुसार सध्याच्या सूक्ष्मातील संकटकाळात वाईट शक्तींच्या त्रासांचे प्रमाण पुष्कळ वाढले आहे. जवळजवळ प्रत्येक मनुष्यालाच अल्प-अधिक प्रमाणात वाईट शक्तींचे त्रास होत आहेत. त्या त्रासांमुळे मनुष्याचे जीवन समस्यामय आणि दुःखी तर बनतेच, तसेच त्याची साधनाही नीट होत नाही. यासाठी प्राधान्याने वाईट शक्तींच्या त्रासांच्या निवारणासाठी नामजप करणे आवश्यक ठरते. तो करून उर्वरित वेळी आध्यात्मिक उन्नतीसाठी नामजप करणे योग्य ठरते.

काही जण काही वर्षे प्रयत्नपूर्वक नामजप करण्याचा प्रयत्न करतात. असे करूनही अनुभूती न आल्यास त्यांना वाटते, 'नामात काही अर्थ नाही.' मग अध्यात्मावरचा त्यांचा विश्वासच उडतो. त्यांना हे कळत नाही की, त्या नामजपात दोष नाही, तर आपण निवडलेला नामजप स्वतःच्या आध्यात्मिक उन्नतीसाठी योग्य नाही; म्हणून त्या नामजपाची प्रचीती येत नाही. 'व्यक्ती तितक्या प्रकृती, तितके साधनामार्ग' या अध्यात्मातील सिद्धांतानुसार कोणी कोणते नाम घ्यावे, हे लक्षात घेतले पाहिजे. हे सर्वसामान्यांना कळावे, हा या ग्रंथाचा उद्देश आहे.

गुरूंनी किंवा अध्यात्मातील अधिकारी व्यक्तीने एखादे नाम घ्यायला सांगितले, तर ते पूर्ण श्रद्धेने घ्यावे; कारण ते त्या व्यक्तीच्या हिताचेच असते; पण 'तसे सांगणारी कोणी व्यक्ती आपल्या जीवनात आली नाही, तर कोणते नाम घ्यावे ?', असा प्रश्न सर्वसामान्यांना पडणे साहजिक आहे. त्यांना या ग्रंथाद्वारे मार्गदर्शन मिळेल.

साधकाची साधनेतील वर्षे, त्याच्यात साधकत्व निर्माण झालेले असणे वा नसणे आणि तो समष्टी साधना (उदा. अध्यात्मप्रसाराची सेवा) करत असणे वा नसणे या घटकांनुसार साधकाच्या साधनेच्या त्या त्या टप्प्यानुसार

त्याने कोणता नामजप करायचा, हेही या ग्रंथात सांगितले आहे. नामजपाच्या जोडीलाच मुद्रा आणि न्यास करणे, तसेच स्वभावदोष आणि अहं यांच्या निर्मूलनासाठी 'स्वयंसूचना' देणे लाभदायक असण्यामागील शास्त्रही स्पष्ट केले आहे. कोणते नामजप करू नयेत, 'ॐ'चा नामजप कोण करू शकतो, नामजपांचे होणारे परिणाम इत्यादी माहितीही ग्रंथात दिली आहे.

'हा ग्रंथ वाचून आवश्यक तो नामजप करून सर्वांनी शीघ्र आध्यात्मिक उन्नती करून घ्यावी', ही श्री गुरुचरणी प्रार्थना ! – **संकलक**

## सनातनच्या चैतन्यमय ग्रंथसंपदेची ठळक वैशिष्ट्ये !

- अध्यात्मातील प्रत्येक कृतीविषयी 'का अन् कसे' यांची शास्त्रीय उत्तरे !
- विज्ञानयुगातील वाचकांना समजेल अशा आधुनिक वैज्ञानिक भाषेतील (उदा. टक्केवारी) ज्ञान !
- तात्त्विक विवेचनच नव्हे, तर साधना कृतीत आणण्याविषयी मार्गदर्शन !
- पृथ्वीवर कोठेही उपलब्ध नसलेल्या अमूल्य अशा ईश्वरी ज्ञानाचा अंतर्भाव !
- अध्यात्मातील विविध गोष्टींच्या संदर्भात वैज्ञानिक उपकरणांद्वारे केलेले संशोधन, सूक्ष्म स्तरावरील प्रक्रिया दर्शवणारी चित्रे अन् लिखाण !

## सनातनच्या ग्रंथकार्यात सहभागी होऊन समष्टी साधना करा !

मराठी भाषेतील ग्रंथांचे संकलन करणे; मराठी, हिंदी आणि इंग्रजी ग्रंथांचे विविध भाषांत भाषांतर करणे आणि ग्रंथांची संरचना 'इन्‌डिझाईन' या संगणकीय प्रणालीत करणे, या कार्यांत सहभागी होण्यासाठी संपर्क करा – (०८३२) २३१२३३४ किंवा granthgoa@gmail.com

टीप : ग्रंथात काही सूत्रांच्या शेवटी मराठी किंवा इंग्रजी संकेतांक केवळ कार्यालयीन सोयीसाठी दिले आहेत.